**Date : 18-08-2025**

**विषय : संस्थेच्या पुनर्निर्माणा नंतर सभासदांना मिळणाऱ्या फ्लॅट्स / डुप्लेक्स च्या Allotment Procedure संबंधी मेळावा.**

काल संस्थेच्या मधुकर जोशी सभागृहात 'पुनर्निर्माण योजनेत सभासदांना मिळणाऱ्या फ्लॅट्स / डुप्लेक्स चे वाटप कसे करावे' ह्यावर विचार करण्यासाठी सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांचा एक मेळावा घेण्यात आला. ह्या मेळाव्याला ९२ सभासद आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

सर्वप्रथम पंच समिती सदस्य श्री प्रदीप नेवाळकर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून असे स्पष्ट केले की मेळाव्याचा उद्देश्य फक्त allotment procedure वर सर्वांची मतं जाणून घेण्याचा आहे. सगळ्यांचे विचार जाणून घेतल्या नंतर सर्वसंमतीने जसे ठरेल त्या प्रमाणे एक विशेष सर्व साधारण सभेत, सहकारी खात्याच्या अधिकाऱ्या समोर, सदनिकांचे वाटप करण्यात येईल. कुठल्या ही निर्णया पर्यंत पोचण्यास जर अजून काही मेळावे घ्यावे लागले तर तसे ही करता येऊ शकेल.

संस्थे चे सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी वरील विषया वर पंच समिती चे काय विचार आहेत ते मांडले. त्या प्रमाणे सदनिकांचे वाटप ..
एक - सभासदांच्या आपसातल्या सहमतीने, दोन - चिठ्ठया टाकून लॉटरी सिस्टीम ने,
तीन - प्रत्येक सभासदा ने त्याला मिळणाऱ्या सदनिकेच्या श्रेणी मधे एक - दोन - तीन असे पर्याय द्यायचे आणि त्या प्रमाणे चिठ्ठया टाकून एक एक करून सदनिकांचे वाटप करायचे.

ह्याच तीन पर्यायांचा श्री यशवंत केंजळे यांनी म्हाडा तसेच इतर जागी जागा वाटपा मधे कसा उपयोग केला जातो त्याचा व्यवस्थित खुलासा केला. त्यांच्या अनुभवा प्रमाणे जवळ पास 80 टक्के प्रकरणात आपसातल्या सहमती ने वाटप निर्धारित करता आले आहे.

चर्चेत श्री अनिल टाकळकर, श्री राजीव साबडे, श्री मोरेश्वर जोशी, श्री हेमंत आलबाळ, श्रीमती सुवर्णा दीक्षित, श्रीमती निर्मला सावदेकर आणि श्री अनंत बेदरकर यांनी त्यांचे विचार मांडले. सर्वसाधारण कल सचिवांनी सांगितलेल्या तीन ऑप्शन्स प्रमाणेच होता.

सुवर्णा दीक्षित यांनी त्यांना मिळणाऱ्या फ्लॅट च्या मजल्यावरून त्यांचा विरोध व्यक्त केला. त्यावर सचिवांनी स्पष्ट केले की त्यांनी मागितलेल्या आकारा चा स्टँड एलोन फ्लॅट ग्रीड मधे जिथे बसतो तिथेच देण्यात आला आहे.

श्री बेदरकर यांची सूचना होती की जे 19 वयस्कर पत्रकार सभासद आज हयात आहेत त्यांना वाटपा मधे प्राधान्य देण्यात यावे.

श्री पटवर्धन यांनी सांगितले की पंच समितीत चर्चा करून एक फॉर्म प्रत्येक सभासदाला लवकरच देण्यात येईल ज्यात सभासदांना मिळणाऱ्या सदनिकेंची सर्व माहिती असेल आणि सभासदांनी त्यांचे ऑप्शन्स भरून ठरवलेल्या निश्चित अवधीत ते फॉर्म पंच समिती कडे द्यायचे आहेत.

श्री नेवाळकर यांनी सभासदांना आश्वस्थ केले की त्यांना पुनर्निर्माण संबंधी कुठली ही शंका असल्यास त्यांनी श्री पटवर्धन किंव्हा श्री नेवाळकर यांच्याशी संपर्क साधवा.

सचिवांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मेळावा संपल्याचे जाहीर केले.

पंच समितीच्या वतीने